# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
| --- | --- | --- |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९९ /२०२५ दि. २१/०१/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या **डोंबिवली पुर्व येथील पाटणकर चौक (चार रस्ता) ते टिळक चौक** दरम्यानचे रस्त्यावर दिनांक २५/०१/२०२५ रोजी पासुन रस्ता कॉंक्रिंटीकरणाचे काम एम.एम.आर.डी.ए. अंतर्गत करणार आहेत. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, **पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद–** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली पुर्व येथील मानपाडा रोड अथवा राजेंद्रप्रसाद रोडवरून चार रस्ता पाटणकर चौक मार्गे टिळक चौक येथे येणारी वाहतुक **पाटणकर चौक (चार रस्ता)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने उजवीकडे वळण घेवुन **संत नामदेव पथ अथवा आईस फॅक्टरी, मानपाडा रोड मार्गे** ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली पुर्व येथील संत नामदेव पथ मानपाडा रोडकडुन चार रस्ता पाटणकर चौक मार्गे टिळक चौक येथे येणारी वाहतुक **पाटणकर चौक (चार रस्ता)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने मानपाडा रोडने सरळ जावुन उजवे वळण घेवुन पीपी चेंबर्स, भगतसिंग रोडमार्गे ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली पुर्व येथील टिळक रोड कडुन ताई पिंगळे चौक/सर्वेश हॉल मार्गे भगतसिंग रोड पीपी चेंबर्स कडे येणारी वाहतुक **ताई पिंगळे चौक/सर्वेश हॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने टिळक रोडने सरळ जावुन मदन ठाकरे चौक येथे उजवे वळण फडके रोडमार्गे ईच्छीत स्थळी जातील.

सदर अधिसुचना दिनांक २५/०१/२०२५ ते काम संपेपावेतो लागु करण्यात येत आहे. या संदर्भातील यापुर्वीच्या सर्व अधिसुचना या अधिसुचनेद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. या कालावधीत काही सुचना/आक्षेप असल्यास लेखी स्वरूपात पोलीस उप आयुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग, तीन हात नाका, एल.बी.एस.रोड ठाणे (प.) येथे कळवावे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिति अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

CamScanner